ARTHA Poona 4.

उद्योगधंदे, बँकिंग,
अर्थशास्त्र, व्यापार,
सहकार, इत्यादि
विषयांस वाहिलेलें
एकमेव मराठी
साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं
प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : १२ नये पैसे
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २४ | पुणें, बुधवार तारीख ६ ऑगस्ट, १९५८ | अंक ११

## विविध माहिती

**अहमदाबाद येथील प्रदर्शन**—अहमदाबाद येथें शास्त्रीय ज्ञानाचे शांततामय उपयोग दर्शविणाऱ्या एका प्रदर्शनाचें उद्घाटन डॉ. कृष्णन् ह्यांनीं केलें. प्रदर्शनांत भारताच्या पहिल्या अणुभट्टीचा नमुना व अमेरिकेच्या पहिल्या उपग्रहाचा नमुना ठेवण्यांत आला आहे. त्याशिवाय अणुशास्त्रीय प्रगतिविषयक कांहीं छायाचित्रेंहि पहाण्यासाठी ठेवण्यांत आलीं आहेत.

**गिरण्यांजवळील गहूं काढून घेतला**—जीवनावश्यक वस्तूंच्या कायद्यास अनुसरून उत्तर प्रदेश सरकारनें लखनौ व कानपूर येथील दोन गिरण्यांजवळील १४,००० मण गहूं आपल्या ताब्यांत घेतला. ह्या गव्हाची विक्री सरकारनें काढलेल्या वाजवी किंमतीच्या धान्याच्या दुकानांतून करण्यांत येणार आहे.

**विद्यापीठाला मदत**—उत्तर प्रदेशांत तराई येथील सरकारी मालकीच्या शेतावर स्थापन करण्यांत येणाऱ्या ग्रामीण विद्यापीठासाठी मध्यवर्ती सरकारनें एक कोटी रुपयांची रक्कम मंजूर केली आहे. हें विद्यापीठ कॉलेजांना जोडून घेणारें असावें कीं विद्यार्थ्यांच्या रहाण्याची सोय करणारें असावें, तें अद्याप ठरलेलें नाहीं.

**इस्पितळांच्या मदतींत काट**—सौराष्ट्रामधील सरकारी इस्पितळांना सरकारकडून जी मदत मिळते तींत मुंबई सरकारनें ७५ टक्के घट केली आहे. त्यामुळें इस्पितळांतील गरीब रोग्यांना फुकट मिळणारें अन्न बंद करावें लागलें आहे. ही घट फार मोठी असल्यानें मदत पूर्वीप्रमाणें चालू करण्यांत यावी अशी खटपट करण्यांत येत आहे.

**पाकिस्तानांतील वाढत्या किंमती**—गेल्या कांहीं दिवसांत पाकिस्तानांत पाव, तूप, अंडीं, भाजी, साबण, इत्यादि रोज लागणाऱ्या वस्तूंच्या किंमती २५ टक्क्यांनीं एकदम वाढल्या. किंमतींत झालेल्या वाढीला आळा बसावा म्हणून उपाय सुचविण्यासाठी पाकिस्तान सरकारनें एक कमिटी नेमली आहे.

**कच्छमधील म्युनिसिपालिट्या**—कच्छमधील चार म्युनिसिपालिट्यांच्या प्रतिनिधींची एक बैठक भरली होती. बैठकींत सर्व म्युनिसिपालिट्यांनीं एकाच दरानें करांची आकारणी करावी असें ठरविण्यांत आलें. त्याचप्रमाणें, करमणुकीवरील करांत हिस्सा मागणारी विनंती राज्य-सरकारला करण्यांत आली.

**स्टेट बँकेची शाखा**—कल्याणजवळ असलेल्या उल्हासनगर ह्या ठिकाणीं स्टेट बँकेची शाखा उघडण्यांत यावी, अशी मागणी तेथील प्रमुख नागरिकांनीं केली आहे. ह्या कामासाठी योग्य त्या अधिकाऱ्यांकडे लवकरच एक शिष्टमंडळ धाडण्यांत येणार आहे.

**सरकारी नौकरांना शिक्षा**—भारत सरकारच्या गृहखात्याच्या खास पोलिस दलानें सरकारी नौकरांच्या गैरवागणुकीबद्दल ज्यांच्यावर कायदेशिर इलाज केले होते अशा १०० सरकारी नौकरांना गेल्या एप्रिलपासून ते जूनपर्यंतच्या काळांत शिक्षा करण्यांत आल्या. ७३ नौकरांना त्यांच्या त्यांच्या खात्यातर्फे शिक्षा करण्यांत आल्या. त्यांत ९ गॅझेटेड अधिकारी आहेत.

**अणुबाँबचे बळी**—१९४५ मध्यें जपानमधील हिरोशिमा व नागासकी हीं दोन शहरें अणुबाँबच्या हल्ल्यांत उध्वस्त झालीं होतीं. त्यावेळीं घातक अशा प्रकारचें जें विषारी द्रव्य हवेंत पसरलें त्याचे परिणाम अद्यापहि शहरांतील नागरिकांना सोसावें लागत आहेत. गेल्या जानेवारीपासून आणखी ५८ जपानी नागरिक विषारी द्रव्याला बळी पडले.

**हंगेरींतील निर्वासित**—१९५६ च्या नोव्हेंबर महिन्यांत हंगेरींत रशिअनधार्जिण्या सरकारविरुद्ध उठाव झाला होता. त्यावेळीं बरेच हंगेरिअन नागरिक देश सोडून अमेरिकेला गेले होते. अशा ३२,००० हंगेरिअन नागरिकांना अमेरिकन नागरिकत्वाचे सर्व हक्क देणाऱ्या कायद्याला प्रे. आयसेनहोअर ह्यांनीं मान्यता दिली आहे.

**सुताची सहकारी गिरणी**—उत्तरप्रदेश राज्यांतील हातमाग विणकरांना सुताचा पुरवठा करण्यासाठी इटावा येथें सूत कातण्याची एक सहकारी गिरणी काढण्यांत येणार आहे. गिरणीसाठी ७० लाख रुपयांचें भांडवल लागेल. त्यांपैकी ११ लाख रुपये विणकरांच्या सहकारी संस्थांनीं जमविलें असून ह्याचप्रमाणें आणखी ७ लाख रुपये जमविण्यांत येणार आहेत.

**गिरणीवाल्यांची मागणी**—सौराष्ट्र गिरणी-मालकसंघानें सरकारकडे अशी मागणी केली आहे कीं, कामगारांना देण्यांत येणाऱ्या महागाई भत्त्यांत कपात करण्याची अगर कामगारांची संख्या कमी करण्याची परवानगी देण्यांत यावी. ह्या भागांतील गिरण्या तोट्यांत चालत असल्यानें त्या बंद न पडण्यासाठी हा उपाय सुचविण्यांत आला आहे.

**टाटांच्या एंजिनांची किंमत**—टाटा इलेक्ट्रिक लोकोमोटिव्ह कंपनीच्या कारखान्यांत तयार करण्यांत आलेल्या एंजिनांच्या किंमतीचा प्रश्न भारत सरकार व कंपनी ह्यांनीं लवादाकडे सोंपविण्याचें ठरविलें आहे. सरकारनें प्रत्येक एंजिनाला ३,७५,००० रुपये देऊं केले होते. कंपनीला ३,९३,००० रुपये पाहिजे आहेत.

## १९५६ मधील सर्वसाधारण विम्याचें काम

भारतीय विमा कंपन्यांना १९५६ मध्यें निव्वळ हप्त्यांपासून एकूण ८·८९ कोटी रुपये उत्पन्न झालें. त्याची विभागणी अशी: आग विमा— ३·३० कोटि रुपये, सागरी विमा— १·६५ कोटि रुपये आणि इतर प्रकारच्या विमा-व्यवसायांतून ३·९४ कोटि रुपये. भारतीयेतर विमा कंपन्यांचे बाबतींत हेच आंकडे अनुक्रमें ६·९५, २·९९, १·९६ व २ कोटि रुपये असे आहेत. भारताबाहेरील भारतीय विमा कंपन्यांस या वर्षांत निव्वळ हप्त्यांपासून एकूण १०·३६ कोटि रु. उत्पन्न झालें. त्यांपैकी आग, सागरी व इतर प्रकारच्या विमा-व्यवसायांतून अनुक्रमें ६·१४, १·८९ व २·३३ कोटि रुपये उत्पन्न आलें.

### ३१ डिसेंबर, १९५७ रोजीं १८९ विमा कंपन्या

एक वा अधिक प्रकारांचा सर्वसाधारण विमा-व्यवसाय करण्यासाठीं १९३८ च्या विमा कायद्यानुसार नोंदणी केलेल्या कंपन्यांची संख्या ३१ डिसेंबर, १९५७रोजीं १८९ होती. त्यांत ९१ कंपन्या भारतीय व ९८ भारतीयेतर होत्या. भारतीय विमा कंपन्यांपैकी मुंबई राज्यांत नोंदणी झालेल्या ५१ विमा कंपन्यांस हप्त्यांपासून झालेल्या एकूण उत्पन्नाचा सुमारें ६३ टक्के भाग मिळाला.

### उत्पन्न व खर्च

सर्व भारतीय कंपन्यांचें या कालांतील उत्पन्न १९·५८ रुपये तर खर्च १७·१९ कोटि रुपये झाला. ३१ डिसेंबर, १९५६ रोजीं भारतीय विमा कंपन्यांकडे ४२·४४ कोटि रुपयांची मालमत्ता होती. १९५५ व १९५४ चे हेच आंकडे अनुक्रमें ४१·६५ व ३८·७१ कोटि रुपये असे होते. या रकमेपैकी १९·९ टक्के रक्कम सरकारी रोख्यांत व बिनसरकारी संस्थेंत, ५·३ टक्के रक्कम परकीय सरकारांच्या रोख्यांत, २०·५ टक्के रक्कम शेअर्स व डिबेंचर्समध्यें, १९ टक्के रक्कम ठेवी, रोकड व स्टॅम्पस्मध्यें व २·६ टक्के रक्कम कर्जांत गुंतविलेली आहे. भारतीयेतर कंपन्यांची मालमत्ता ३१ डिसेंबर, १९५६ रोजीं ११·७५ कोटि रुपयांची होती व त्यांनीं सरकारी रोखे व निमसरकारी संस्था, शेअर्स व डिबेंचर्स, ठेवी, रोकड व स्टॅम्प्स् यांत अनुक्रमें २२·६, २३·४ व १९·४ टक्के रक्कम गुंतविली होती.

### विमा-व्यवसायांत वाढ

भारतांतील विमा व्यवसायाची परिस्थिति १९५४ पर्यंत स्थिर होती. १९५५ मध्यें औद्योगिक उत्पादन वाढीनुसार या व्यवसायांतहि वाढ झाली. तथापि, १९५६ मध्यें औद्योगिक उत्पादन वाढीनुसार या व्यवसायाची व्याप्ति वाढली नसल्याचें अहवालांत म्हटलें आहे.

भारतीय विमा कंपन्यांच्या एकूण व निव्वळ हप्त्यांपासून होणाऱ्या उत्पन्नांत १९५१ पासून १९५६ पर्यंत क्रमशः वाढ होत असल्याचें या अहवालावरून दिसून येतें. या वर्षांत एका विमा कंपनीस न्यायालयानें आपला गाशा गुंडाळण्याचा हुकूम दिला. भारतीय तसेंच इतर विमा कंपन्यांचा आयुर्विमा निधि ३१ डिसेंबर, १९५६ रोजीं १०·३६ कोटि रुपये होता. कंट्रोलर ऑफ इन्शुरन्स यांजकडे आलेल्या २९६ तंट्यांपैकी फक्त ४ प्रकरणांचा या दिवसापर्यंत निकाल लागलेला नव्हता १९५६ व १९५७ या वर्षांत अनुक्रमें ४८,५९७ व ९८,६०१ विमा एजंटांना परवाने देण्यांत आले.

गेल्या सहा वर्षांत अनेक वेळां वार्षिक आंकडेवारी सादर न करणाऱ्या कंपन्यांची एकूण संख्या सुमारें ५० असून असें करण्याच्या वाढत्या प्रवृत्तीबद्दल अहवालाच्या अखेरीस चिंता व्यक्त करण्यांत आली आहे.

## ट्रेझरी बिलांची विक्री

सुमारें २८ महिन्यांच्या खंडानंतर गेल्या आठवड्यांत ट्रेझरी बिलांच्या विक्रीस पुनः प्रारंभ झाला. १ कोटि रुपयांचीं ट्रेझरी बिलें विक्रीस काढण्यांत आलीं होतीं, तीं घेण्यासाठी १,६०,००,००० रुपयांचे अर्ज आले. शेंकडा ९९·४८४ रुपये अगर त्यावरील जास्त रकमेचीं टेंडरें पूर्णपणें स्वीकारण्यांत आलीं. ९९·२७५ रुपयांच्या टेंडरवाल्यांना टेंडरच्या ८०% ट्रेझरी बिलें मिळालीं. १ कोटी रुपयांचीं टेंडरें स्वीकारण्यांत आलीं, त्यावर व्याजाचा सरासरी दर २·७२६% पडला. चालू आठवड्यांत २ कोटि रुपयांचीं टेंडरें मागविण्यांत आलीं आहेत.

१९५७–५८ अखेर ट्रेझरी बिलांच्या स्वरूपांतील सरकारचें एकूण कर्ज १२,९५,१२,००,००० रु. चें आहे.

### सरकारच्या ट्रेझरी बिलांची विक्री

(आंकडे लक्ष रुपयांचे)

| वर्ष | विक्रीस काढलेलीं ट्रेझरीबिलें | मागणी | विक्री | व्याजाचा सरासरी दर | रिझर्व्ह बँकेस विकलेलीं ट्रेसरी बिलें | ट्रेझरी बिलांतील स्वरूपांतील एकूण बाकी देणें |
|---|---|---|---|---|---|---|
| १९५२-५३ | ४२,०० | ६५,६० | ४२,०० | २.२६ | १२,३३,०९ | ३,१५,२१ |
| १९५३-५४ | ५६,५० | ९१,३८ | ५६,५० | २.४५ | १३,०९,०६ | ३,३४,९५ |
| १९५४-५५ | २३,५० | ३७,९७ | २३,५० | २.५३ | १५,२३,८१ | ४,७१,८७ |
| १९५५-५६ | ५५,५० | ८६,२५ | ५५,५० | २.५२ | ११,९४,०९ | ५,९५,२५ |
| १९५६-५७ | १,०० | १,०३ | १,०० | २.५३ | २७,३७,५८ | ८,३५,७० |
| १९५७-५८ | | | | | ४२,३६,६५ | १२,९५,१२ |

**ब्रिटिश वसाहतीची अमेरिकेकडे मागणी**—दक्षिण अमेरिकेंतील ब्रिटिश गिआना ह्या वसाहतीचे व्यापार व उद्योगमंत्री श्री. चेड्डी जगन् वसाहतीच्या औद्योगिक व शेतीच्या विकासासाठी अमेरिकेकडून मदत मिळविण्याची खटपट करीत आहेत. ब्रिटिश सरकारनें १९५९ पर्यंत अवघें ५५ लाख पौंड देऊं केल्यानें त्यांची निराशा झाली आहे.

**अमेरिकेनें केलेले अणुस्फोट**—१९५८ च्या एप्रिलच्या २८ तारखेपासून जुलैच्या २६ तारखेपर्यंत अमेरिकेनें पॅसिफिक महासागरांत अणुस्फोटाचे ३२ प्रयोग केले, अशी माहिती रशिआच्या संशोधनखात्यानें जाहीर केली आहे. कांहीं वेळां तर एकाच दिवशीं दोन स्फोट करण्यांत आले अशी त्याची माहिती आहे.

**इराकच्या सरकारचें धोरण**—इराकमध्यें राजसत्तेविरुद्ध सशस्त्र क्रांति होऊन जें नवें सरकार अधिकारावर आलें आहे त्यानें संयुक्त-अरब-प्रजासत्ताकाशीं मोठ्या प्रमाणावर आर्थिक व व्यापारी संबंध प्रस्थापित करण्याचें ठरविलें आहे. पूर्वीच्या सरकारनें अशा संबंधांना जवळ जवळ पूर्णपणें बंदी केली होती.

**हिशोब खात्याचें यांत्रिकीकरण**—इंडिअन एअरलाइन्स कॉर्पोरेशननें आपल्या हिशोबखात्याचें यांत्रिकीकरण करण्याचें ठरविलें आहे. ह्या उपक्रमामुळें सुमारें ९०० नोकरांची गरज कमी होणार आहे. तथापि ह्या नोकरांना बेकार न करता त्यांना कॉर्पोरेशनच्या इतर खात्यांत काम देण्यांत येणार आहे.

**सिमेंटची निर्यात**—भारतामधील सिमेंटच्या उत्पादनांत हलुहलु वाढ होत असल्यामुळें ९ राज्यांत सिमेंटची विक्री खुल्या बाजारांत चालू आहे. २ लाख टन सिमेंटची निर्यात करण्याचें भारत सरकारनें ठरविलें आहे. पाकिस्तान, सिलोन व सिंगापूर ह्यांना सीमेंटची निर्यात करण्यांत येणार आहे.

# अर्थ

बुधवार, ता. ६ ऑगस्ट, १९५८





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## लाइफ इन्शुअरन्स कॉर्पोरेशनचे फंड कसें गुंतविले जावेत ?

लाइफ इन्शुअरन्स कॉर्पोरेशननें आपले फंड कसें गुंतवावेत, हा प्रश्न अद्याप अनिर्णितच आहे. आयुर्विमा व्यवसायाचें राष्ट्रीयीकरण १९५६ मध्यें झालें, तेव्हां कंपन्यांची गुंतवणूक विमा कायद्याच्या २७ व २७–अ ह्या कलमांना धरून होती. मे, १९५६ मध्यें कॉर्पोरेशनच्या स्थापनेबाबत पार्लमेंटांत चर्चा झाली, त्यावेळीं श्री. देशमुख, तेव्हांचे अर्थमंत्रि, ह्यांनीं सांगितलें कीं, २७–अ कलमांत योग्य ती सुधारणा करून तें ला. इ. कॉर्पोरेशनला लागूं करण्यांत येईल. पुढें डिसेंबर, १९५७ मध्यें अर्थमंत्रि श्री. कृष्णम्माचारी ह्यांनीं खुलासा केला, कीं कॉर्पोरेशननें नामवंत कंपन्यांचे शेअर्स बाजारांत खरीदण्यास हरकत नाहीं; त्यामुळें औद्योगिक कंपन्यांच्या वाढत्या नफ्याचा फायदा विमेदारांना मिळूं शकेल. छगला कमिशनच्या चौकशींतूनहि कॉर्पोरेशनच्या गुंतवणुकीच्या धोरणाबद्दल निश्चित असें कांहींच निष्पन्न झालें नाहीं.

पुढें, पं. नेहरू अर्थमंत्रि असतांना, कॉर्पोरेशनचें धोरण काय असावें, असा प्रश्न उपस्थित झाला. पण त्याचा निर्णय झाला नाहीं. त्यामुळें हा प्रश्न अद्याप पूर्वीप्रमाणेंच अनिश्चित आहे.

ह्याच प्रश्नाशीं निगडित असा प्रश्न म्हणजे कॉर्पोरेशनच्या अधिकारांबाबतचा आहे. तिची मालकी सरकारकडे असल्या-कारणानें, तिला सरकारच्या सर्वसाधारण धोरणापलिकडे जातां येणार नाहीं, हें उघड आहे. त्याचबरोबर हेंहि खरें आहे, कीं सरकारी निर्णय तिच्यावर बंधनकारक असतील तर तिला योग्य प्रकारें आपलें काम करतां येणारच नाहीं. कॉर्पोरेशनच्या स्वातंत्र्याच्या मर्यादा अद्याप निश्चित झालेल्या नाहींत. "टाटा कार्टर्ली" त्रैमासिकाच्या ताज्या अंकांत ह्याविषयीं चर्चा करण्यांत आली असून त्याबाबत सूचना करण्यांत आल्या आहेत.

### सर्वसाधारण तत्त्वें

कारभाराचे बाबतींत कॉर्पोरेशनला पूर्ण स्वातंत्र्य हवें; पण समाधानकारक कारभाराविषयीं सरकारनें सर्वसाधारण तत्त्वें ठरवून देण्यास हरकत असूं नये. ( १ ) सरकारनें कॉर्पोरेशनच्या मार्गदर्शनासाठी धोरणविषयक निवेदन करावें; त्यांत वरचेवर बदल केला जाऊं नये. ( २ ) खास सूचना लेखी दिल्या जाव्यात. पण अशा सूचना वरचेवर दिल्या जाऊं नयेत. विमा-व्यवसायाच्या हिताला बाधक अशा त्या सूचना असूं नयेत. ( ३ ) कॉर्पोरेशनच्या कार्याचा मधूनमधून आढावा घेतला जावा व त्यावर मत व्यक्त केलें जावें.

कॉर्पोरेशनचा कारभार व्यापारी पद्धतीनें चालावयाचा, म्हणजे भांडवल सुरक्षित राखून जास्तींत जास्त व्याज मिळविण्याचा प्रयत्न करावयाचा. ह्या दृष्टीनें विचार केला, तर कॉर्पोरेशनच्या पैशांचें खालीलप्रमाणें वर्गीकरण करतां येईल :—

( अ ) खेळतें भांडवल.

( ब ) विमेदारांना द्यावयाच्या रकमेच्या तरतुदीसाठी गुंतवावी लागणारी रकम.

( क ) उरलेली रकम, म्हणजे 'वाढावा'.

कांहीं रकम, खेळतें भांडवल म्हणून चालू खर्च भागविण्यासाठी हाताशीं ठेवावी लागेल. ही रकम मुख्यत: रोख ठेवली जावी; त्याचा कांहीं भाग अल्पमुदतीच्या रोख्यांत गुंतवला तरी त्याचा हेतु व्याजापेक्षा लवकर रकम हातीं यावी हाच असावा.

### "बिझिनेस इन्व्हेस्टमेंट्स"

विमेदारांना द्याव्या लागणाऱ्या रकमेच्या तरतुदीची गुंतवणूक दीर्घ मुदतीच्या रोख्यांत करायला हरकत नाहीं. विमेदारांना द्याव्या लागणाऱ्या रकमेचा बिनचूक अंदाज करतां येणें कठीण आहे; पण त्यासाठी राखलेली रकम व्यापारी पद्धतीनेंच गुंतवण्यांत आली पाहिजे. त्या गुंतवणुकीला 'बिझिनेस इन्व्हेस्टमेंटस्' असें म्हणण्यास हरकत नाहीं. विमेदारांच्या हिताच्या दृष्टीनेंच ह्या गुंतवणुकीचें धोरण आखण्यांत आलें पाहिजे. म्हणजे तें धोरण ठरविण्याचा संपूर्ण अधिकार कॉर्पोरेशनकडेच हवा; सरकारी ढवळाढवळीस वाव उपयोगी नाहीं.

'वाढावा' राहील, त्यापैकी ९५% रकम विमेदारांसाठी राखून ठेवावी, असें ला. इ. कॉर्पोरेशन कायद्याचें २८ वें कलम सांगतें. उरलेली ५% रकम सरकार सांगील त्याप्रमाणें उपयोगांत आणावयाची आहे. ह्याचा अर्थ असा, कीं सरकारी सूचनांची मर्यादा ह्या ५% पुरतीच आहे; ह्या बाबतींत कॉर्पोरेशननें सरकारचें ऐकायला हरकत नाहीं. ह्या ५% च्या गुंतवणुकीवर पुरेसें व्याज पडलें नाहीं, तरी चालेल. पण ते पैसे वाया जाता कामा नयेत; विम्याच्या हेतूशीं विसंगत ती गुंतवणूक होता कामा नये.

कॉर्पोरेशनच्या "बिझिनेस इन्व्हेस्टमेंटस" चे बाबतींत सरकारनें जुन्या २७ अ कलमाप्रमाणें कांहीं बंधनें घालून द्यावींत किंवा काय, असा प्रश्न आतां उपस्थित होतो. सरकारी रोख्यांत कमींत कमी किती प्रमाणांत रकम ठेवावी व कंपन्यांच्या शेअर्स-मध्यें जास्तींत जास्त किती असावी, हें ठरवून देतां येईल. तथापि, त्यांत लवचीकपणा अवश्य असायला हवा. ग्रेटब्रिटनमध्यें विमा कंपन्यांच्या गुंतवणुकीवर सरकारचें कोणतेंहि नियंत्रण नाहीं. अमेरिकेंत प्रत्येक स्टेटमध्यें वेगवेगळे कायदे आहेत. न्यूयॉर्क स्टेटमध्यें कंपन्या १०% फंडस् प्रेफरन्स भागांत गुंतवूं शकतात; ऑर्डिनरी भागांत गुंतवणूक करतां येत नाहीं. कॉर्पोरेशन व्यापारी पद्धतीनें स्वतःच नियम करून ते पाळूं शकेल. ( १ ) सरकारी रोखे व शेअर्स, ( २ ) दीर्घ मुदतीचे व मध्यम मुदतीचे रोखे, ( ३ ) ठराविक व्याजाचे शेअर्स व डिबेंचर्स आणि अनिश्चित व्याजाचे शेअर्स, अशी त्यांची विभागणी करावी लागेल. शेअर्स वेगवेगळ्या उद्योगधंद्यांचे घ्यावे लागतील.

| आयुर्विमा कंपन्यांच्या जिंदगीची गुंतवणूक ( % ) | भारत (१९५५) | ग्रेट ब्रिटन (१९५४) | अमेरिका (१९५५) |
|---|---|---|---|
| सरकारी व म्युनिसिपल रोखे | ५६·८ | ३६·९ | १२·९ |
| पॉलिसीवर कर्जें | ८·६ | १·२ | ३·६ |
| इतर कर्जें | ०·५ | २·३ | …… |
| गहाणखतें | ४·५ | १०·३ | ३२·६ |
| डिबेंचर्स | ५·८ | १२·७ | ३९·९ |
| प्रेफरन्स शेअर्स | ३·७ | ७·४ | ४·० |
| ऑर्डिनरी शेअर्स | ६·४ | १४·४ | |
| मालमत्ता | ५·१ | ७·३ | २·९ |
| इतर जिंदगी | ८·६ | ७·५ | ४·१ |
| | १००·० | १००·० | १००·० |

## १९५६ च्या कंपनी कायद्याचें पश्चिम विभागांतील कामकाज

### ३० जून रोजीं संपलेल्या तिमाहीचें पुनर्विलोकन

३० जून रोजीं संपलेल्या तिमाहींत १९५६ च्या कंपनी कायद्याखालीं पश्चिम विभागांत ( मुंबई आणि मध्यप्रदेश राज्यांचा बनलेला ) एकूण ४५,९०,२०,००० रुपये अधिकृत भांडवल असलेल्या ६८ कंपन्या नोंदविण्यांत आल्या. त्यामागील तीन महिन्यांत एकूण १२,५७,१२,५०० रुपये अधिकृत भांडवल असलेल्या ६३ कंपन्या नोंदविण्यांत आल्या होत्या. नव्या ६८ कंपन्यांपैकी ३ पब्लिक कंपन्या व ६० प्रायव्हेट कंपन्या असून त्यांचें अधिकृत भांडवल अनुक्रमें ११,०५,००,००० रुपये व ३४,८५,२०,००० रुपये आहे. कंपनी कायदा शासनयंत्रणा विभागाच्या मुंबई विभागाच्या प्रादेशिक संचालकांनीं प्रकाशित केलेल्या एप्रिल ते जून या तिमाहीच्या पुनर्विलोकनांतील आंकडेवारींत ही माहिती दिली आहे.

पुनर्विलोकनाच्या या तिमाहींत नोंदणी झालेल्या प्रमुख कंपन्यांपैकी मुंबई राज्यांतील ‘ दि रिफायनान्स कॉर्पोरेशन फॉर इंडस्ट्री प्रा. लि. ’ ही एक कंपनी असून तिचें अधिकृत भांडवल २५,००,००,००० रुपयांचें आहे.

या तिमाहींत एकूण ५३ कंपन्या बुडाल्या. त्यामागील तिमाहींतील हाच आंकडा ३० होता. १९५६ च्या कंपनी कायद्याच्या ५६० कलमाखालीं ६७ कंपन्यांचीं नांवें नोंदणी बुकावरून कमी करण्यांत आलीं. १९५६ च्या कंपनी कायद्यांतील निरनिराळ्या तरतुदींचा भंग केल्याबद्दलच्या एकूण ६९ तक्रारी या तिमाहींत नोंदविण्यांत आल्या. त्यांपैकी ४० प्रकरणें निकालांत काढण्यांत आलीं. या तिमाहींत नोंदविण्यांत आलेल्या कंपन्यांपैकी एकूण १०,००,००० रुपये अधिकृत भांडवल असलेल्या दोन कंपन्यांखेरीज बाकीच्या सर्व कंपन्या मुंबई राज्यांत नोंदविण्यांत आल्या.

## भारताच्या सावकारांचा विचारविनिमय

भारताच्या दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या यशासाठीं परदेशीय मदतीची फार गरज आहे. अशी मदत मिळविण्यासाठीं श्री. बी. के. नेहरू आणि श्री. टी. स्वामिनाथन् हे भारतीय सरकारचे प्रतिनिधी सध्यां ब्रिटन, अमेरिका, पश्चिम जर्मनी, इत्यादि देशांच्या सरकारांबरोबर प्राथमिक स्वरूपाचीं बोलणीं करीत आहेत. भारताला कर्जाऊ मदत देणाऱ्या देशांची एक बैठक लवकरच जागतिक बँकेनें वॉशिंग्टन येथें भरविण्याचें ठरविलें आहे. ह्या बैठकींत भारताच्या परदेशीय चलनाच्या गरजा काय आहेत आणि त्या गरजा भागविण्यांत आल्या तर त्यांची जबाबदारी पेलण्याइतकी भारताची आर्थिक परिस्थिति भक्कम आहे कीं नाहीं, ह्याविषयीं अंदाज घेण्यांत येईल असें दिसतें. बैठकीला जपान आणि बहुधा कॅनडाचाहि प्रतिनिधी हजर राहील.

आपली परदेशीय चलनाची गरज भागविण्यासाठीं भारतहि कसून प्रयत्न करीत आहे. परदेशीय चलनाची टंचाई लक्षांत घेऊन दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाची कांहीं छाटाछाट करणें, निर्यात वाढविणें आणि आयात कमी करणें असे उपाय योजण्यांत येत आहेत. तरीहि, १९६१ सालअखेरीस म्हणजे दुसरी योजना पुरी होण्याच्या सुमारास भारताला अंदाजें १०० कोटी डॉलर्सच्या परदेशीय चलनाच्या तुटीस तोंड द्यावें लागेल. ह्यापैकी दोन तृतीयांश तूट येत्या १०—१२ महिन्यांत उद्भवेल अशीं लक्षणें दिसत आहेत. ह्या परिस्थितींतून मार्ग काढण्यासाठीं तात्पुरता उपाय म्हणून भारत सध्यां आपल्या पौंडी गंगाजळींतून उचल करीत आहे. ही उचल भरून काढण्यासाठीं पुढील वर्षापर्यंत परदेशीय मदत मिळविण्याचे प्रयत्न करण्यांत येईल.

मदत, कर्जें आणि उधारी ह्या सर्वांच्या रूपानें भारताला सुमारें ६५ कोटी डॉलर्सची तांतडीची गरज आहे, असा अंदाज लंडनमधील तज्ज्ञांनीं केला आहे. शिवाय पुढील दोन वर्षांत ४० ते ५० कोटी डॉलर्सची गरज लागणार आहे. ह्यापूर्वीं भारतानें २०० कोटी डॉलर्स किंमतीच्या सामानाच्या मागण्या नोंदविल्या आहेत. यंत्रसामुग्री, आवश्यक असा कच्चा माल, संरक्षण-खात्याला लागणारें साहित्य, इत्यादि अनेक प्रकारच्या मालाच्या मागण्या कारखानदारांकडे नोंदण्यांत आलेल्या आहेत. एकूण मागण्यांपैकी सुमारें ४० टक्के मागण्या ब्रिटिश कारखानदारांकडे नोंदलेल्या आहेत. पण ब्रिटिश कारखानदारांना भारताच्या आर्थिक भक्कमपणाविषयीं शंका वाटत आहे असें दिसतें. कारण भारतानें घेतलेल्या मालाची किंमत चुकती केली नाहीं तर आपलें नुकसान होऊं नये म्हणून त्यांनीं बहुतेक नोंदण्यांचा विमा उतरविला आहे. ब्रिटनच्या एक्सपोर्ट क्रेडिट गॅरंटी डिपार्टमेंटनें ही जोखीम घेतली आहे. कांहीं कारणानें भारताला किंमत देतां आली नाहीं, तर ब्रिटिश ट्रेझरीला ४० कोटी डॉलर्स कारखानदारांना नुकसानभरपाईदाखल द्यावे लागतील. त्यामुळें ब्रिटिश पौंडावर आणखीच ताण पडेल. म्हणून वॉशिंग्टनला भरणाऱ्या भारताच्या धनकोंच्या बैठकींत सर्वांनीं मिळून मदतीची कांहीं तरी योजना आखावी, अशी ब्रिटनची इच्छा आहे. आर्थिक व राजकीय कारणांसाठीं अशा प्रकारचा सुसंगत प्रयत्न होणें अगत्याचें आहे, असें ब्रिटनचें मत आहे.

दातांच्या स्वच्छतेसाठी
★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

# पश्चिम आशिआंतील जागृतीस इंग्लंड-अमेरिकांचा विरोध

## आर्थिक हितसंबंधांचा प्रश्न

### तेलाचा पहिला परवाना

मध्यपूर्वेतील तेलाच्या खाणींचा पहिला परवाना इराणच्या शहानें एका इंग्रज नागरिकाला १८७२ मध्यें दिला. परंतु राशियाच्या विरोधामुळें तो पुढील वर्षी रद्द करण्यांत आला. त्यानंतर ब्रिटिश व फ्रेंच धनिकांनीं नवे परवाने मिळविले, परंतु तेलाची निष्पत्ति झाली नाहीं. सन १९०० मध्यें इराण सरकारनें विल्यम डार्सी ह्या इंग्रज उद्योगपतीला इराणचे उत्तरेकडील पांच प्रांत वगळून बाकी सर्व ठिकाणचें तेल उपसण्याचा परवाना दिला. कांहीं रोख रक्कम व कांहीं वार्षिक रक्कम त्या परवान्याप्रीत्यर्थ त्यानें इराणला द्यावयाची होती. इराणच्या कांहीं वजनदार मंत्र्यांना डार्सीनें आपल्या नफ्यांत वाटेकरी केल्यामुळें हा परवाना मिळणें शक्य झालें.

डार्सीनें बर्मा ऑइल कंपनीचें आर्थिक पाठबळ मिळविलें. ह्या कंपनीनें ब्रह्मदेशांत तेलखाणींत खूप पैसे मिळविले होते. दक्षिण इराणमध्यें १९०८ सालीं भरपूर तेलाच्या खाणी सापडल्या, तशी अँग्लो पर्शियन ऑईल कंपनी त्यांतील तेल काढण्यासाठी स्थापना करण्यांत आली. तिच्या २० लक्ष पौंडांच्या भागभांडवलापैकी ९ लक्ष, ७० पौंडांचे भाग बर्मा ऑईल कंपनीनें घेतले.

### तेल-कंपनींत ब्रिटिश सरकारची भागीदारी

ब्रिटिश नाविक दलांतील आगबोटी कोळशाऐवजीं तेलावर चालविण्यास प्रारंभ झाल्यानंतर १९१२ मध्यें विन्स्टन चर्चिलनें (त्यावेळीं तो फर्स्ट लॉर्ड ऑफ दि ॲडमिरॅल्टी होता). ॲस्क्विथच्या मंत्रिमंडळाला पटवून दिलें कीं, नाविक दलासाठी तेलाचा पुरवठा स्वाधीन असायला हवा; तेल-कंपन्यांवर अवलंबून असतां कामा नये. त्याचा परिणाम म्हणजे अँग्लो-पर्शियन कंपनीचें भांडवल वाढवून दुप्पट करण्यांत आलें आणि ब्रिटिश सरकारनें त्यांत २२ लक्ष पौंड गुंतवून निर्णायक बहुमत मिळविलें. ह्या कंपनीची कमालाची भरभराट झाली. १९५० सालीं तिला ८ कोटि, ४४ लक्ष पौंड नफा झाला. ब्रिटिश सरकारला ५ कोटि पौंड कर भरून, तिला ३ कोटि, १० लक्ष पौंड नफा उरला. त्या वर्षी कंपनीनें ३० टक्के डिव्हिडंड वाटलें आणि गंगाजळींत २ कोटि, ५० लक्ष पौंड टाकले. त्यामुळें तो ६ कोटि, ५० लक्ष पौंड झाला. ब्रिटिश सरकारची गुंतवणूक किती किफायतशीर झाली पाहा !

### इराणमधील राष्ट्रीयीकरण

१९३७ मध्यें कंपनीचें नांव बदलून तें अँग्लो-इराणियन कंपनी असें ठेवण्यांत आलें होतें. १९५० अखेरपर्यंत तिनें रॉयल्टीच्या स्वरूपांत इराणला १५ कोटि पौंड पोचते केलेले होते. १९५१ मध्यें इराण सरकारनें डॉ. मुसादिकच्या नेतृत्त्वाखाली कंपनीचें राष्ट्रीयीकरण जाहीर केलें ! त्यामुळें कंपनीची मालमत्ता इराण सरकारची बनली, पण तेलाचें काम स्थगित झालें. इराण-सरकारची रॉयल्टी थांबल्यामुळें तें आर्थिक अडचणींत सापडलें आणि डॉ. मुसादिकच्या राजीनाम्यानंतरच्या नव्या इराणी सरकारनें नवा करार केला; त्याअन्वयें कंपनीची इराणमधील मालमत्ता ब्रिटिश, अमेरिकन, फ्रेंच व डच अशा आंतरराष्ट्रीय गटाकडे सुपूर्त करण्यांत आली. अँग्लो इराणियन ऑईल कंपनीच्या भरभराटीमुळें कित्येक अमेरिकन व इतर तेल कंपन्या पश्चिम आशियांतील तेलाकडे आकृष्ट झाल्या.

### मध्यपूर्वेतील तेलाचें उत्पादन

१९३० सालीं तेलाचें जागतिक उत्पादन १९.५० कोटि टन झालें, त्यांपैकी पश्चिम आशियांतील उत्पादन ६३ लक्ष टन म्हणजे फक्त ३.३ टक्के होतें. १९५० मध्यें एकूण उत्पादनांतील पश्चिम आशियाच्या उत्पादनाचा वांटा ८.६६ कोटी टन, म्हणजे १६.८ टक्के झाला. १९५६ मधील उत्पादनाचे तत्सम आंकडे १८.०४ कोटि टन व २१.८ टक्के असे आहेत. जागतिक उत्पादनांतील पश्चिम आशियाचा वांटा आणखी वाढत जाणार हें निश्चित आहे.

पश्चिम आशियांतील १९५६ मधील तेलाच्या उत्पादनापैकी १.१ कोटि टन तेल सोडलें तर बाकीचें सर्व तेल चार देशांतून उत्पादन करण्यांत आलें:- कुवैत ५.९२ कोटि टन, सौदी अरेबिया ५.०६ कोटि टन, इराक ३.४३ कोटि टन व इराण २.४० कोटि टन.

### तेल-कंपन्यांच्या भागीदाऱ्या

कुवैतच्या खाणी सर्वांत समृद्ध असून त्यांच्यावर ब्रिटिश पेट्रोलियम कंपनीचे ( म्हणजे मूळ अँग्लो इराणिअन कंपनी व गॉल्फ कंपनीचे ) भागीदारामध्यें प्रभुत्व आहे. सौदी अरेबियांतील खाणी अरेबिअन-अमेरिकन ऑईल कं. कडे आहेत. ती सामान्यतः 'Aramco' ह्या नांवानें ओळखली जाते. स्टँडर्ड ऑईल कंपनी ऑफ न्यू जर्सी ( ३० टक्के ), स्टँडर्ड ऑईल कंपनी ऑफ कॅलिफोर्निया ( ३० टक्के ), दि टेक्सास कंपनी ( ३० टक्के ) व दि सोकोनी मोबिल कंपनी ( १० टक्के ) अशी 'Aramco' मध्यें भागीदारी आहे. इराणमधील नियंत्रक कंपनींत ब्रिटिश पेट्रोलियम कंपनीची ४० टक्के, रॉयल डच शेल कंपनीची १४ टक्के, दि कोपान्यी फ्रॉसेऽझ् दे पेत्रोल ६ टक्के, वरील पांच अमेरिकन कंपन्यांची प्रत्येकी ५ टक्के व नऊ इतर अमेरिकन कंपन्यांची मिळून उरलेली भागी आहे. इराकमध्यें व त्याच्या शेजारच्या प्रदेशांत चार कंपन्यांचा गट तेलाचें उत्पादन करतो, त्यांतील सर्वांत महत्त्वाची म्हणजे इराक पेट्रोलियम कंपनी होय. ब्रिटिश पेट्रोलियम कंपनीची चारीहि घटक-कंपन्यांत भागी २३.७५ टक्के आहे. रॉयल डच शेल कंपनी, दि कोंपान्यी फ्रॉसेऽझ् दे पेत्रोल व दि निअर ईस्ट डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन ह्यांचीहि तेवढीच भागी आहे. बेहरिनच्या खाणी त्या मानानें लहान आहेत; त्यांची मालकी स्टँडर्ड ऑईल कंपनी ऑफ कॅलिफोर्निया व दि टेक्सास कंपनी ह्यांच्याकडे विभागून आहे. पश्चिम आशियांतील माहीत असलेल्या तेलाच्या सांठ्यापैकी ६४ टक्के सांठ्यावर अमेरिकेची मालकी आहे; ब्रिटिश व डच कंपन्यांची मिळून मालकी ३१ टक्के सांठ्यावर आहे आणि उरलेल्या ५ टक्क्यांवर फ्रेंच कंपन्यांची मालकी आहे.

### तेलाचे नळ

पश्चिम ऑशियांत सध्यां तेल-शुद्धीचे नऊ कारखाने आहेत व ते दरसाल ६ कोटि मेट्रिक टन तेल शुद्ध करूं शकतात. आबादान ( इराण ) च्या कारखान्यांत २.५ कोटि टन व सौदी अरेबियाच्या कारखान्यांत ९५ लक्ष टन तेल शुद्ध होतें. ह्या तीन कारखान्यांत मिळून तीन-चतुर्थांश काम होतें. वेगवेगळ्या कंपन्यांनीं हें तेल बंदरापर्यंत पोचविण्यासाठी नळ टाकलेले आहेत, आणि ते इराक, सीरिया, सौदी अरेबिया, जॉर्डन,

लेबॅनॉन, इराण, ह्या देशांतून गेलेले आहेत. सुवेझचा कालवा इजिप्तच्या नियंत्रणाखाली गेल्यामुळें तो मार्ग तेलवाहतुकीला केव्हां बंद होईल ह्याचा नेम नाहीं, अशी भीति निर्माण झाली आहे. म्हणून, इराणमधून दुसरे नळ टाकण्याच्या योजना आंखल्या जात आहेत.

### पश्चिम आशियांतील तेलाचा खप

पश्चिम आशियांतील तेलाचा उत्पादन-खर्च फारच कमी आहे. तेथील खाणींतून निघणारें तेल भरपूर आहे. बेहरिन कॉर्पोरेशनच्या अध्यक्षांनीं सांगितल्याप्रमाणें, त्याचा उत्पादनखर्च, स्थानिक शेखला रॉयल्टी देऊनहि, प्रत्येक बॅरलला ( ३६ गॅलन्सना ) फक्त सव्वा रुपया आहे. ह्या स्वस्तपणामुळें पश्चिम आशियांतील तेलाला जागतिक मागणी आहे. १९५५ मध्यें कम्युनिस्ट देश वगळून बाकीच्या जगांत ७० कोटि टन तेलाचा खप झाला, त्यांपैकी ४० कोटि टन तेल एकट्या अमेरिकेंत खपलें. पूर्वी अमेरिकेंतून तेल निर्गत होत असे; आतां अंतर्गत उत्पादन पुरत नसल्यामुळें दरसाल ५ कोटि टन तेल आयात करावें लागतें. १९५५ मध्यें पश्चिम युरोपांत १२ कोटि टन तेल खपलें, त्यांपैकी ९० टक्के तेल पश्चिम आशियांतील कारखान्यांनीं पुरविलें.

### तेलाच्या रॉयल्टीचा विनियोग

ह्या तेलाच्या निर्गतीमुळें पश्चिम आशियांत पैशाचा पूर येत असल्यास नवल नाहीं. पश्चिम आशियांतील दारिद्र्य आणि अक्षरशत्रुत्व सुप्रसिद्धच आहे. तेलाच्या खाणीखेरीज तेथें दुसरें कशाचेंहि उत्पादन होत नाहीं. तेलापासून मिळणाऱ्या उत्पन्नाचा विनियोग पाणी-पुरवठा, खतांचा उपयोग, शिक्षणप्रसार, उद्योगधंद्यांची स्थापना, इत्यादींकडे केला गेला असतां, तर पश्चिम आशियांत नंदनवन उभें राहिलें असतें. परंतु बहुतेक अरब देशांतून तें घडून येऊं शकलें नाहीं. राज्यकर्त्यांनीं त्यांकडे लक्षच पुरविलें नाहीं. उदाहरणार्थ, सौदी अरेबियामध्यें रॉयल्टीचें उत्पन्न राजाच्या चैनीवरच खर्च होतें; त्याचे नातेवाईक व पित्ते ह्यांनाहि त्याचा फायदा मिळतो. ज्या टोळ्या उपद्रव करूं लागतात त्यांच्या म्होरक्यांना पैसे चारले जातात. इराकमध्यें नव्या उद्योगधंद्यांच्या स्थापनेसाठीं एक डेव्हलपमेंट बोर्ड स्थापन करण्यांत आलें होतें. परंतु सरकारी हस्तक्षेप, लांचलुचपत आणि कार्यक्षमतेचा अभाव ह्यांमुळें पैशाचा अपव्यय झाला. इराणमध्यें तेल कंपन्या आपल्या नोकरांच्या शिक्षणावर व उद्धारावर बराच खर्च करीत आहेत.

### ब्रिटिशांचा प्रयत्न

बेहरीन, कातार आणि कुवेत हीं ब्रिटिशांच्या अंमलाखाली आहेत; तेथील शेख ब्रिटिश रेसिडेंटांच्या सल्ल्यानें वागतात. तेलाचें उत्पन्न तेथें तीन भागांत वांटलें जातें. एक भाग शेखाच्या खासगी खर्चासाठी, एक भाग कारभाराच्या खर्चासाठी व जनतेच्या उद्धारासाठी आणि एक भाग लंडनमध्यें शिलकेंत ठेवण्यासाठीं. कातारचा शेख उधळपट्टीसाठी सुप्रसिद्ध आहे. त्याला त्याकरितां १९५५ मध्यें २ कोटि, ३५ लक्ष डॉलर मिळाले व बाकीची ७५ टक्के रक्कम जनतेच्या हितासाठी उपलब्ध झाली. तथापि, इजिप्तवरील इंग्रज-फ्रेंचांच्या स्वारीमुळें अरब देशांतून इंग्रजांचें वजन कमी झालें आहे आणि ब्रिटिशांना काढून टाकून स्थानिक लोकांचा भरणा व्हावा, असा सर्वत्र प्रयत्न होत आहे.

### जास्त रॉयल्टीची मागणी

पश्चिम आशिआंतील तेल कंपन्यांनीं सध्यापेक्षा जास्त रॉयल्टी स्थानिक सरकारांना दिली, तरी भागीदारांचें डिव्हिडंड कमी होणार नाहीं, इतका त्यांचा धंदा किफायतशीर आहे. इराण सरकारनें इटॅलो-पर्शिअन कंपनीशीं नुकताच नवा करार केला, त्यांत कंपनीनें नफ्याच्या ७५ टक्के एवढी रॉयल्टी द्यावी, असें ठरलें आहे. 'Armaco' कॉर्पोरेशननेंहि आपली रॉयल्टी ५० टक्क्यांची ७० टक्के करावी अशी मागणी केली जात आहे. इराकमध्येंहि अशीच चळवळ चालू आहे. इटालियन कंपनीनें जास्त रॉयल्टी देऊं केल्यामुळें इतर कंपन्यांवर दडपण येत आहे आणि अरब राज्यकर्त्यांना दुखावणें शक्य नसल्यानें रॉयल्टी वाढविणें कंपन्यांना भाग पडणार आहे.

### जागृत लोकमत : जुलमी राजांना लष्करी पाठिंबा

अमेरिकन सरकार अमेरिकन-तेल कंपन्यांच्या पाठीशीं असणें स्वाभाविक आहे. अरब राज्यकर्त्यांची मैत्री कायम ठेवण्यांत त्यांचें हित आहे; कारण तेच पैशाच्या मोबदल्यांत पाश्चात्य देशांशीं सहकार्य करण्यास तयार आहेत. पण, तेथील जनतेंत राजकीय जागृति झाली असून अमेरिकन वर्चस्व झुगारून देण्याचे प्रयत्न होत आहेत. सिरिया आणि आतां इराक यांतील घडामोडी त्या दृष्टीनें उद्बोधक आहेत. जॉर्डनमध्यें हुसेन राजाला विरोध करणारे थोडथोडके नाहींत. सर्वच अरब देशांतून कम्युनिस्टांचें सामर्थ्य वाढत आहे. जॉर्डनचा राजा हुसेन हा आपली सत्ता टिकविण्यासाठी मार्शल लॉसारख्या कायद्यांचा अवलंब दीर्घकाळ करीत आला आहे. बेहरीनमध्यें इंग्रजांना थोडा विरोध दिसून येतांच ब्रिटिश सरकारनें तो स्थानिक शेखाच्या द्वारें मोडून टाकला. जे विरोधक सांपडले ते तुरुंगांत टाकण्यांत आले; जे निसटले ते पुनः बंड करण्याची संधि पाहत आहेत. सौदी अरेबियाच्या राजाच्या उधळपट्टीमुळें तेथील सैन्याच्या अधिकाऱ्यांत असंतोष पसरला आहे. अशा रीतीनें सर्वच देशांच्या राज्यकर्त्यांचें स्थान डळमळीत आहे. ब्रिटिश साम्राज्यशाहीला नांवें ठेवणाऱ्या अमेरिकेवर लोकशाही विरुद्ध जुलमी अरब राजांना पाठिंबा देण्याची पाळी आली आहे! अरब राजांनीं आपल्या प्रजेच्या उद्धाराकडे अजूनहि लक्ष पुरवलें नाहीं आणि तेलाचें उत्पन्न स्वतःच्याच चैनीवर खर्च केलें, तर त्यांचीं राज्यें टिकणार नाहींत. प्रजेस सोव्हिएटचें साहाय्य मिळेल व सोव्हिएटच्या हस्तक्षेपाला बांध घालण्यासाठी अमेरिका पुढें सरसावेल हें आतां सिद्धच झालें आहे.

मध्यपूर्वेंतील तेल-पुरवठ्यावर ह्या घटनांचा दुष्परिणाम झाला, तर अमेरिका, मेक्सिको व दक्षिण अमेरिका ह्यांतून जरूर तें तेल आयात करूं शकेल. फ्रान्सला अल्जेरियांत नव्या सांपडलेल्या खाणी अजून उपलब्ध आहेत. ग्रेट ब्रिटनची मात्र खरी कुचंबणा होणार आहे. पश्चिम कॅनडांतील खाणी मिळविण्याचा त्याचा प्रयत्न म्हणूनच चालू आहे.

—श्री. वा. काळे

( केसरी-२७-७-५८ )

---

**कच्छमध्यें नवा गौळवाडा**—मुंबई सरकारनें कच्छमध्यें एक नवा गौळवाडा स्थापन करण्याची योजना तयार केली आहे. योजनेच्या शक्याशक्यतेविषयीं तपासणी करण्यासाठी भारत सरकारचे तज्ज्ञ तेथें गेले होते. नव्या गौळवाड्यासाठी सरकारला ७ कोटि रुपये खर्च करावे लागतील. गौळवाड्याला जोडून हाडांच्या खताचा कारखानाहि काढण्यांत येणार आहे.

## अणुविज्ञानाच्या अभ्यासाची सोय

आंध्र विद्यापीठानें अणुविज्ञानाच्या अभ्यासाची सोय करण्यासाठी शाखा उघडली आहे. ह्या शाखेसाठी बांधण्यांत आलेल्या इमारतीचा उद्घाटन समारंभ आंध्र राज्याच्या शिक्षणमंत्र्यांच्या हस्तें करण्यांत आला. ह्या प्रसंगीं बोलतांना शिक्षणमंत्री श्री. पट्टाभीरामराव म्हणाले कीं आज पूर्वींच्या कोणत्याहि काळापेक्षा शास्त्रीय आणि तांत्रिक प्रगतीची अधिक गरज आहे. ही गोष्ट लक्षांत घेऊन भारत-सरकार व राज्य-सरकारें शास्त्रांच्या अभ्यासाला शक्य तितकी मदत करीत आहेत. स्वतंत्र भारतांत शास्त्रीय ज्ञानाचें महत्त्वाचें स्थान लक्षांत घेऊन राष्ट्रीय संशोधन-शाळा व संस्था स्थापन करण्यांत येत आहेत. आतांपर्यंत अशा प्रकारच्या १९ संस्था उघडण्यांत आल्या आहेत. जगांतील अणुविज्ञान आतां अशा अवस्थेत आलें आहे कीं, मोठ्या प्रमाणावर अणुभट्ट्या बांधून त्यांच्या साह्यानें निर्माण करण्यांत आलेल्या शक्तीचा पुरवठा खेड्यांना व शहरांना लवकरच होऊं लागेल. बोटी, पाणबुड्या, रेल्वेचीं एंजिनें, मोठमोठीं विमानें व जलद प्रवास करणारे अग्निबाण ह्यांना लागणारी शक्तीहि अणुविच्छेदनानें मिळूं लागण्याचे दिवस आतां फारसे दूर राहिलेले नाहींत. अन्न टिकविणें, रोगनिदान करणें, शेतीची सुधारणा करणें इत्यादि बाबतींतहि अणुविज्ञानाचा फार उपयोग आहे. भारतांत अणुविज्ञानासंबंधींचें संशोधन अगदीं अलीकडे सुरू झालेलें आहे. आंध्र विद्यापीठानें अणुविज्ञानाच्या शिक्षणाची शाखा १९५४ मध्येंच चालू केली आहे. १९५६ मध्यें विद्यापीठ अनुदान मंडळानें आणि राज्यसरकारनें अणुविज्ञानांतील एम. एससी. पदवीचा अभ्यास सुरू करण्यासाठी उदार हातानें मदत केली. त्यामुळें ह्या विषयाचीहि संशोधन शाळा काढतां आली.

## श्री. गोरवाला ह्यांचें मुंबईतील भाषण

सार्वजनिक कारभार ह्या विषयावरील तज्ज्ञ श्री. ए. डी. गोरवाला ह्यांनीं मुंबई येथें 'सरकारची व धंदेवाल्यांचीं साध्यें व साधनें' ह्या विषयावर व्याख्यान दिलें. ते आपल्या भाषणांत म्हणाले कीं, भारताच्या राज्यघटनेंत आर्थिक व सामाजिक न्याय प्रस्थापित करण्याचें साध्य ठेवण्यांत आलें आहे. पण तें साध्य गांठलें गेलेलें नाहीं. कारण, एकंदरीनें पहातां सरकार हें बड्या भांडवलदारांच्या वजनामुळें भ्रष्ट झालेलें आहे. सरकारवर बड्या भांडवलदारांची जी पकड आहे, ती सहज नष्ट करतां येईल. पण त्यासाठी निवडणुकीसाठी बड्या भांडवलदारांकडून पैसा घेण्याचें बंद करण्यांत आलें पाहिजे. देशांतील प्रमुख राजकीय पक्षानें सामान्य माणसाचा पाठिंबा आर्थिक बाबतींत सुद्धां मिळविण्याचा प्रयत्न करावा. बड्या भांडवलदारांचें मुख्य साध्य पैसा हें आहे. कांहीं धंदेवाले आपलें साध्य कायदेशीर मार्गांनीं गांठतात हें खरें. पण बहुतेक बडे धंदेवाले कर चुकविण्याच्या व इतर आडमार्गांनीं आपलें साध्य गांठतात. देशांत अन्नाची टंचाई आहे व होती. युद्धकाळांत ह्या टंचाईला तोंड देण्यासाठी सरकारनें नियंत्रणें बसविलीं. पण नंतर बड्या धंदेवाल्यांनीं आपल्या वजनाचा उपयोग करून सरकारला नियंत्रणें उठविणें भाग पाडलें. त्यांना अशी भीति वाटली कीं, नियंत्रणें अशींच चालूं राहिलीं तर हळुहळु त्यांचें क्षेत्र आपल्यापर्यंतहि पोंचेल. शिवाय, अन्नधान्याची सट्टेबाजी करून खूप पैसा मिळवितां येतो हें त्यांना माहीत होतें. सरकारी कामांनी पुरेसा पैसा मिळत नाहीं ह्याचें कारण, आज जितका कर गोळा केला जातो तितकाच तो चुकविण्यांत येत आहे.


# पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक, लिमिटेड, लक्ष्मी रोड, पुणें २.

पोस्ट बॉक्स : ५११. ★ टेलिफोन : १४८३.

## सूचना

दि. १ जुलै, १९५७ पासून बँकेनें सेव्हिंग्ज ठेवीवरील व्याजाचा दर दीड टक्क्यावरून द. सा. द. शे. दोन टक्के असा केला आहे.

कायम ठेवी खालील दरानें स्वीकारल्या जातील.

| मुदत | : | व्याजाचा दर |
|---|---|---|
| १ वर्ष | : | $2\frac{1}{2}$ टक्के |
| २ वर्षें | : | $2\frac{3}{4}$ टक्के |
| ३ वर्षें | : | ३ टक्के |
| ५ वर्षें | : | $3\frac{1}{2}$ टक्के |
| १० वर्षें | : | ४ टक्के |

अल्प मुदतीच्या ठेवीचे दरासंबंधीं माहिती बँकेच्या पुणें मुख्य कचेरींत पत्रानें अगर समक्ष मिळूं शकेल.

पुणें २.
ता. ३१-७-५७

वा. ग. आळतेकर
कार्यकारी संचालक

# दि बॉम्बे स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक लि., मुंबई

९, बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई-१.
( स्थापना : १९११ )

चेअरमन : श्री. रमणलाल जी. सरैय्या, ओ. बी. ई.

ह्या बँकेंत गुंतविलेला पैसा हिंदी शेतकरी व सहकारी संस्था ह्यांना साहाय्यकारक होतो.

भरपाई झालेलें भाग भांडवल :

| | |
|---|---|
| भागीदारांतर्फे | रु. ४२,०८,००० |
| मुंबई सरकारतर्फे | रु. ६६,००,००० |
| | रु. १,०८,०८,००० |
| गंगाजळी व इतर फंड : | रु. ६०,७६,००० |
| एकूण ठेवी : | रु. ११,००,२६,००० |
| खेळतें भांडवल : | रु. २०,५०,००,००० |

## ११ जिल्ह्यांमध्यें ६० शाखा

भारतांतील सर्व प्रमुख शहरीं कलेक्शनची व्यवस्था. सर्व तऱ्हेचीं बँकिंगचीं कामें केलीं जातात. सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात. शर्तींबद्दल चौकशी करावी.

जी. एम्. लाड
मॅनेजिंग डायरेक्टर.

## मराठी साहित्यधन गुजरातला पोंचविलें!

### साहित्यिक आदान-प्रदान*

साहित्यिक आदान-प्रदान वेगवेगळ्या भाषांत जेवढें वाढेल त्या त्या मानानें वेगवेगळ्या समाजघटकांतील परस्परांविषयींची समजूतहि वाढत जाईल. आपल्या मातृभाषेच्या प्रादेशिक क्षेत्राबाहेर राहाण्याची संधि ज्यांना लाभते त्यांना ह्या बाबतींत पुष्कळ करतां येण्याला अनुकूलता असते. अशा प्रकारचे प्रयत्न थोड्याफार प्रमाणांत सतत होत असतात. श्री. गोपाळराव विद्वांस यांनीं या कामीं विशेष कामगिरी बजावली आहे.† मराठी साहित्यांतील निवडक कलाकृतींचा गुर्जर बांधवांना त्यांनीं परिचय घडवला आहे. पण यामुळें गुजराती भाषेपेक्षा मराठी भाषेसंबंधींच त्यांनीं आपलें कर्तव्य बजावलें असें म्हणतां येईल.

### प्रा. शशिन ओझा ह्यांचें कार्य

पण एकाद्या गुर्जर बांधवानें प्रेमसंपादनासाठी मराठी भाषेचें अध्ययन करून मराठी साहित्यधन गुजरातला पोंचवलें, अशीं उदाहरणें विरळा. अशा विरळा उदाहरणांतच प्रा. शशिन् ओझा यांची गणना करावी लागेल. पुण्याच्या फर्गसन् व कॉमर्स कॉलेजांतील गुजरातीचे ते अध्यापक. त्यांनीं मराठी मध्यमवर्गांत विशेष लोकप्रिय झालेलीं श्री. श्री. वा. काळे यांचीं दोन पुस्तकें गुर्जराती भाषेंत भाषांतरित केलीं आहेत. 'सुखी जीवननी पगडंडी' आणि 'सदाचारने पगले' या नांवांनीं हीं दोन्हीं भाषांतरें सस्तु साहित्यवर्धक कार्यालयानें प्रकाशित केलीं आहेत.

पूर्वी वडीलधाऱ्या मंडळींकडून घरच्या घरीं जे सहज संस्कार मिळत. त्यांच्याऐवजीं हल्लीं औपचारिक उपदेशाचीं पुस्तकें वाचण्याचा प्रसंग मुलांवर येतो आणि पुष्कळ वेळां तोंडी लावण्याला त्यांतला मालमसाला उपयोगी पडतो अमेरिकेंत ह्या धर्तीचीं भाराभर पुस्तकें प्रकाशित होतात. मराठी जनतेला आतां तशा पुस्तकांची गरज भासूं लागली आहे. श्री. काळे यांचीं पुस्तकें ही गरज फार चांगल्या प्रकारें पूर्ण करतात. प्रा. ओझा यांनीं गुजराती अनुवाद उत्तम प्रकारें केल्यामुळें गुजराती समाजांतहि हीं पुस्तकें निश्चित मान्यता पावत आहेत, असें दिसतें. 'सुखी जीवननी पगडंडी' या पुस्तकाच्या केवळ आठ महिन्यांतच दोन आवृत्त्या निघाल्या. 'सदाचारने पगले' लाहि तसें भाग्य लाभलें तर नवल नाहीं. साहित्याच्या दृष्टीनें ही गोष्ट मोठी अभिमानाची असली, तरी प्रचलित समाजजीवनावरचें तें एक खेदजनक भाष्यहि म्हणावें लागेल: पण त्याला लेखक-अनुवादकांचा इलाज नाहीं.

प्रा. शशिन् ओझा यांच्या ह्या कार्याबद्दल अभिनंदन. आंतरभारतीचें कार्य अशाच प्रकारें त्यांनीं असेंच नेटानें पुढें चालवावें असेंच कोणीहि अपेक्षील.

**सदाचारने पगले-रु. १-२५**

**सुखी जीवननी पगडंडी-रु. १-५०**

प्रकाशक: सस्तुं साहित्यवर्धक कार्यालय, भद्र, अमदाबाद.

---

* "साधना," १९-७-५८.

† श्री. वि. स. खांडेकर आणि श्री. ग. त्र्यं. माडखोलकर ह्यांचें साहित्य श्री. विद्वांस ह्यांनीं गुजरातीमध्यें अनुवादित केलें आहे.


# भोर स्टेट बँक लि.

[स्थापना: १९४४]

**मुख्य कचेरी:-भोर, जि. पुणें.**

शाखा:-पुणें, पाली व शिरवळ.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. २,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | रु. ८५,५०० |

**बोर्ड ऑफ डायरेक्टर्स**

श्री म. व्यं. शिंगरे, अध्यक्ष. — न. भू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष.
रावसाहेब य. वृ. खोले. — श्री. चं. रा. राठी.
श्री. गो. वा. देवी — श्री. बा. ग. धंडुके.

सरकारी रोखे खरेदी-विक्री, व्याजवसुली, पेन्शन कलेक्शन व इतर बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

बँक १ ते ४ वर्षे मुदतीसाठी कायम ठेवी स्वीकारते.

दराबाबत समक्ष चौकशी करावी.

पुणें कचेरी:-बुधवार घ. नं. ३६१-६२, पासोड्या विठोबानजीक. फोन नं. २५७६.

अधिक माहितीसाठी लिहा.

वाय्. एस्. जोशी
मॅनेजर.

# दी भारत इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड

**हेड ऑफिस: पुणें शहर**

शाखा:—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, श्रीरामपूर, ओझर (तांबट) जि. नाशिक, खोपोली जि. कुलाबा

श्री. के. पां. जोशी (अध्यक्ष) — श्री. का. म. महाजन (उपाध्यक्ष)

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. १५,४३,८१० |
| विक्री झालेलें भांडवल | रु. ७,९३,८१० |
| वसूल भांडवल | रु. ४,००,००० |
| रिझर्व्ह फंड व इतर रिझर्व्ह | रु. १,१४,००० |

**एकूण खेळतें भांडवल रु. ७०,००,०००चे वर**

बँकेचे नवीन इमारतींत माफक भाड्यांत सेफ डिपॉझिट लॉकर्सची सोय केली आहे.

**सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.**

श्री. रा. बा. साळवेकर B. A., LL. B.
श्री. नी. ना. क्षीरसागर
} मॅनेजिंग डायरेक्टर्स


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास' ८२१ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.